नमुना दोन

ग्राम :- अमरावती
दुरध्वनी :-०७२१-२६७०२०६
ई-मेल :eozpamravati@gmail.com-
फॅक्स :-०७२१२६६२०१२

जावक क्र:-जिप/शिक्षण/खाप्राशा/ 3460(४) /२०२४ दिनांक :-३८/०५/२०२४

प्रति,

व्यवस्थापक/मुख्याध्यापक

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११,पोट नियम(४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत

आपल्या दिनांक **३०.०६.२०२२** च्या अर्जाच्या संदर्भात शाळेनी केलेल्या पत्रव्यवहार/ शाळेची तपासणी या आधारे

**मी बुध्दभुषण सोनोने, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) दिनांक ०१.४.२०२२ पासुन दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ते ८ करीता शाळेला तात्तपुरत्या स्वरुपात मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

शाळेचे नाव - टाईटन पब्लीक स्कुल बडनेरा ता.अमरावती

**पत्ता - अमरावती ता. जि.अमरावती**

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन आहे.

१) मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थीतीत कोणतेही बंधन नसेल.

२) बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनिमय २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.

३) शाळा नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वचीत गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत,त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्ताच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४) परिच्छेद ३ निर्दीष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल अशी परिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.

५) संस्था/शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा तीच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म,जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढुन टाकण्यात येणार नाही.

८) **(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

**(पाच)** विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकाची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या

दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

९) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

१०) शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

११) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - १६१८७ चौरस मीटर
- एकूण बांधकाम क्षेत्र - ३४२२ चौरस मीटर
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - १४४४० - चौरस मीटर
- वर्ग खोल्यांची संख्या - २२ वर्ग खोल्या
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली - आहे
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. - आहे
- पिण्याच्या पाण्याची सुविधा - आहे
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर - नाही
- अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता-आहे
- वाचन साहित्य विनायासास उपलब्ध. - आहे

१२) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१३) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१४) शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१५) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१६) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

१७) तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक २७०७१५०८००५ असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करताना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१८) शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१९) संस्थेच्या कार्यकारीणी नोंदणीचे नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

२०) जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

२१) सदर मान्यता तात्पुरत्या स्वरुपात प्रदान करण्यात येत आहे.

(बुध्दभुषण सोनोने)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, अमरावती